# तंबाखूविरोधी मोहीम सुरू

## 'क्विट टुडे क्विट नाऊ'द्वारे केली जनजागृती

पणजी, ता. ३० (प्रतिनिधी) : इंडस हेल्थ प्लसने तंबाखूविरोधी जनजागृतीसाठी खास मोहीम सुरू केली आहे. 'क्विट टुडे क्विट नाऊ' या अनोख्या मोहिमेत सिगरेटच्या आकाराचे बाहुलेच लोकांना सिगरेट सोडण्याचे आवाहन करीत आहेत.

पणजीतील आयनॉक्स परिसरातून या मोहिमेस सुरवात झाली. दिवसभर राबविण्यात आलेल्या या अभियानात अडीचशे ते तीनशे लोकांना माहिती प्रदान करण्यात आली. सिगरेट आणि तंबाखू सेवनाचे दुष्परिणाम विषद करणारे बुकलेटही वितरित करण्यात आले. तरुण पिढीतील वाढत्या धुम्रपानामुळे कॅन्सर आणि फुफुसाच्या आजारांचे प्रमाण बळावत आहे.

धुम्रपानामुळे वास्तविक वयाच्या तुलनेत फुफुसाचे कार्य दहा वर्षांनी कमी होते. त्यामुळे अशा प्रकारची जनजागृती मोहीम तंबाखूचा वापर कमी करण्यात सकारात्मक प्रभाव निर्माण करेल, असे इंडस हेल्थ प्लसचे प्रतिबंधात्मक हेल्थकेअर स्पेशालिस्ट अमोल नाईकवाडी यांनी सांगितले.

राज्यातील अठरा हजार लोकांच्या प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीवर आधारित ॲबनॉर्मेलिटी रिपोर्ट तयार करण्यात आला आहे. या अहवालानुसार ४५ ते ५५ वयोगटातील १२ ते १५ टक्के पुरुषांमध्ये धुम्रपानाचे प्रमाण वाढले आहे. तर तरुण पिढीतील पंधरा टक्के स्त्री-पुरुषांना कॅन्सर किंवा फुफुसाच्या आजारांचा धोका आढळून आला आहे.




पणजी : 'क्विट टुडे क्विट नाऊ' अभियानात सहभागी झालेले युवक.